ePaper
‘तिकडून गोळी चालली तर भारताकडून तोफगोळे..’, युद्धविरामानंतर मोदींचा इशारा
वर्ष - 8 । अंक - 279 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- आयपीएलची तारीख ठरली!
- कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच
- काही करण्याची हिंमत केली तर
- ऑपरेशन सिंदूर आणि शस्त्रविराम

www.mahaenews.com | सोमवार, दि. 12 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### पंतप्रधानांच्या निवासस्थानी दिवसभर उच्चस्तरीय बैठका

# ‘तुमची एक गोळी, तर आमचा तोफगोळा!

## लष्कराच्या तिन्ही दलांचे स्पष्टीकरण ; ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरुच राहणार ; ‘पाकव्याप्त काश्मीर’ करार शक्य !

। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज

**भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धविराम घोषित झाला असला, तरी ‘ऑपरेशन सिंदूर’ हे सुरूच राहणार आहे, असा स्पष्ट खुलासा तिन्ही दलाच्या प्रवक्त्यांनी केला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जरी युद्धविराम जाहीर केला असला तरी तो स्वल्पविराम आहे, अशी प्रतिक्रिया संरक्षण विषयकतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी दिवसभर सर्व दलांच्या प्रमुखांचा तसेच संरक्षण विषयक पदाधिकाऱ्यांचा बैठकांचा धडाका सुरूच होता. ‘तुमची एक गोळी आली, तर आमच्याकडून तोफगोळे सोडले जातील’, असा थेट इशारा मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे.**



### भारत-पाक कराराकडे लक्ष..

युद्धविरामाच्या वेळी जाहीर केल्याप्रमाणे दि. १२ रोजी दुपारी बारा वाजता दोन्ही देशांदरम्यान होणारी बैठक आणि करार याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. भारत आता गप्प असला, तरी यानंतर मात्र अधिक आक्रमक होण्याची शक्यता देखील आहे. या करारामध्ये, सिंधू आणि झेलम, चिनाब आणि रावी या नद्यांच्या पाणीवाटपाचा प्रश्न तसेच पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तानचा प्रश्नही चर्चिला जाण्याची शक्यता आहे.

### तोफगोळ्याने उत्तर : मोदी

पाकिस्तानमधून गोळ्या झाडल्या गेल्या, तर भारतातून तोफगोळे डागले जातील, असा स्पष्ट संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’ थांबणार नसून ते सुरुच असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर नव्हे, तर भारताने स्वतःच्या अटींवर युद्धविरामाची घोषणा केल्याची माहिती दिली आहे.

### पाकड्यांना न भरून येणाऱ्या जखमा!

‘ऑपरेशन सिंदूर’ च्या माध्यमातून भारताने पाकिस्तानला अशा जखमा केल्या आहेत, ज्या भरून येण्यास बरीच वर्षे जावी लागतील. गेल्या चार दिवसात भारतीय सैन्याने १०० पेक्षा जास्त दहशतवाद्यांना नरकात पाठवले आणि नऊ दहशतवादी अड्डे आणि पाकिस्तानच्या लष्करी पायाभूत सुविधा नष्ट केल्या आहेत. थोडक्यात, त्यांची बलस्थानेच उद्ध्वस्त केली आहेत !

### स्वत:च्या अटींवर भारताचा युद्धविराम !

भारताने स्वतःच्या अटींवर युद्धविरामाची घोषणा केली असून पाकिस्तानने युद्धबंदी आणि अमेरिकेशी चर्चेची विनंती केल्यानंतर, भारताने स्वतःच्या अटींवर युद्धविरामची घोषणा केली. त्यापूर्वी, दि. ९ मेच्या रात्री, अमेरिकेचे उपाध्यक्ष जे.डी.व्हान्स यांनी नरेंद्र मोदींशी संवाद साधला होता.

### पाकिस्तानचे आठ एअरबेस लक्ष्य

जर पाकिस्तानने काहीही आगळीक केली, तर आम्ही त्याला योग्य उत्तर देऊ. या संभाषणानंतर, दि. १० मेच्या रात्री, पाकिस्तानने भारतातील २६ ठिकाणी हल्ला करण्याचा प्रयत्न केला, भारताने पाकिस्तानला योग्य उत्तर दिले. ‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत पाकिस्तानच्या आठ एअरबेसना लक्ष्य केले.

### भारताची भूमिका पारदर्शक आणि स्पष्ट..

पाकिस्तानसोबत युद्धविराम झाल्यानंतर भारत सरकारने स्पष्ट केले, की पाकिस्तानसोबत राजकीयदृष्ट्या, परराष्ट्र व्यवहारमंत्री किंवा राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार पातळीवर कोणतीही चर्चा होणार नाही. पाकिस्तानशी चर्चा फक्त ‘डीजीएमओ’ पातळीवरच होईल. हा स्पष्ट संदेश भारताने जगाला दिला आहे. मध्यस्थीसारख्या कोणत्याही गोष्टीला यापुढे वाव राहणार नाही.

### अमेरिकन राष्ट्राध्यक्षांना स्पष्ट संदेश

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात चर्चा झाली. ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान मोदी म्हणाले होते की आम्ही दहशतवाद्यांचा नाश करू. मोदींचा स्पष्ट संदेश होता, की जर सीमेपलीकडून गोळी झाडली गेली, तर आमच्याकडून गोळी झाडली जाईल. ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू झाल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत, बहावलपूर, मुरीदके, मुझफ्फराबाद येथील दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले, आणि भारताची आक्रमक भूमिका जगाने पाहिली. भारताने कोणत्याही नागरी वस्त्यांवर हल्ले केलेले नाहीत.

### पाकव्याप्त काश्मीर परत घेणे, हा एकमेव मुद्दा !

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवासस्थानी उच्चस्तरीय अनेक बैठका झाल्या. परिस्थिती निवळलेली नाही. ‘ऑपरेशन सिंदूर’ अंतर्गत भारत सरकार लष्करी भूमिकेवर अजूनही ठाम आहे. एवढेच नाही तर भारताने काश्मीरबाबत आपली भूमिकाही स्पष्ट केली आहे. आता फक्त एकच मुद्दा उरला आहे, तो म्हणजे पाक व्याप्त काश्मीर परत घेणे, याचा पुनरुच्चार या बैठकांमध्ये झाला. पाकिस्तानची खुमखुमी थांबलेली नाही, त्यामुळे लष्कराने आपल्याला देण्यात आलेल्या अधिकाराचा पुरेपूर वापर करावा आणि त्यांना धडा शिकवावा, असे आदेशही देण्यात आले आहेत.

ePaper
'तिकडून गोळी चालली तर भारताकडून तोफगोळे..', युद्धविरामानंतर मोदींचा इशारा
| वर्ष - 8 | अंक - 279 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- आयपीएलची तारीख ठरली!
- कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच
- काही करण्याची हिंमत केली तर
- ऑपरेशन सिंदूर आणि शस्त्रविराम

www.mahaenews.com | सोमवार, दि. 12 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 'दीड वर्षांत अजितदादा मुख्यमंत्री होणार'

# फडणवीस दिल्लीत जाणार!

## माजी खासदार भास्करराव पाटील खातगावकर यांचे मोठं भाकीत!

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी मुख्यमंत्रिपदावर केलेल्या विधानाची राज्यभरात चर्चा झाली होती. मलाही अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री व्हावं वाटतं, पण योग येत नाहीये, असं अजित पवार हसत-हसत म्हणाले होते. दरम्यान, नांदेडमधील मोठे नेते तथा माजी खासदार भास्करराव पाटील खातगावकर यांनी अजितदादांना मुख्यमंत्रिपद मिळणार, असं भाकित केलं आहे.**



### 'देवेंद्र फडणवीस भविष्यात दिल्लीत जाणार'

नांदेडमध्ये राष्ट्रवादी पक्षाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात भास्करराव खतगावरकर बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी मुख्यमंत्रिपदावर भाष्य केलं. विशेष म्हणजे सध्या मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस हे भविष्यात दिल्लीत जाणार आहेत, असंही भाकीत त्यांनी केलंय.

### खतगावकर नेमकं काय म्हणाले?

"दादा माझं भाकीत खरं होतं. मी अशोक चव्हाण यांना म्हटलं होतं तुम्ही मुख्यमंत्री व्हाल ते मुख्यमंत्री झाले. दिल्लीच्या सेंट्रल हॉलमध्ये राजकीय चर्चा होते. तिथे अशी चर्चा आहे की येत्या वर्ष-दीड वर्षात देवेंद्र फडणीस दिल्लीला जातील आणि तुम्ही मुख्यमंत्री व्हाल," असं खतगावकर म्हणाले आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री झाल्यानंतर तुम्ही नांदेडमध्ये सत्कार घ्यावा अशी विनंतीही खतगावकर यांनी अजित पवार यांना केली.

### अजित पवार नेमकं काय म्हणाले?

काही दिवसांपूर्वी अजित पवार मुंबईतील एका कार्यक्रमात बोलत होते. या कार्यक्रमात बोलताना त्यांनी राज्यात महिलेला मुख्यमंत्रिपद मिळायला हवे, अशा आशयाची भावना व्यक्त केली. तसेच मलाही अनेक वर्षांपासून वाटतं की मुख्यमंत्री व्हावं. पण कुठे जमतंय, असं अजित पवार म्हणाले होते. त्यांच्या या विधानावर राजकीय वर्तुळात अनेक प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या होत्या.

### अजित पवार यांना मिळाली होती थेट ऑफर

खतगावकर यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होत आहे. काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी मुख्यमंत्रिपदाविषयी विधान केल्यानंतरही अशाच वेगवेगळ्या चर्चा रंगल्या होत्या. विरोधकांनी तर त्यांना महाविकास आघाडीत येण्याची ऑफर दिली होती. अजितदादा जोपर्यंत भाजपासोबत आहेत, तोपर्यंत त्यांची मुख्यमंत्री होण्याची इच्छा पूर्ण होऊ शकणार नाही. त्यामुळे त्यांनी महाविकास आघाडीत यावे. त्यांची मुख्यमंत्री होण्याची इच्छा पूर्ण होईल, अशी थेट ऑफरच ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत यांनी दिली होती.

अजित पवार यांचे कौतुक करताना ते म्हणाले, "तुमची काम करण्याची पद्धत अत्यंत सकारात्मक आहे. प्रशासनावरची मजबूत पकड, विषयांचा सखोल अभ्यास आणि काम करण्यासाठी लागणारी शारीरिक क्षमता — या सगळ्या गोष्टी फार थोड्या लोकांमध्ये पाहायला मिळतात, आणि त्या तुमच्याकडे आहेत. यावेळी आमदार इंद्रनील नाईक यांच्याही भूमिकेचा उल्लेख करत खतगावकर म्हणाले, "इंद्रनील नाईक यांनी मुंबईचे दौरे थोडे कमी करून गावागावांत फिरावे. दादा, आता या सगळ्यांना घेऊन जिल्ह्यात दौरे करा."

### पक्षप्रवेश सोहळा

नांदेड जिल्ह्याच्या मुखेड तालुक्यातील चव्हाणवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. शेषराव चव्हाण, मार्केट कमिटीचे माजी सभापती सुशांत राठोड, नांदेडचे माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष राठोड, नांदेडचे माजी नगरसेवक उदय चव्हाण यांच्यासह अनेकांनी पक्षात प्रवेश केला. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, माजी मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या विचारांवर चालणारा आपला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आहे. या पक्षात सामील होणाऱ्या प्रत्येकाचा योग्य तो सन्मान ठेवला जाईल, असं अजित पवारांनी यावेळी आश्वस्त केलं.

### अजित पवार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

भास्कर पाटील खतगावकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला. "तुम्ही नांदेडमध्ये तिसऱ्यांदा आला आहात. माझ्या पक्षप्रवेश सोहळ्यात लेंडी धरणासाठी निधीची मागणी केली होती आणि ती तुम्ही अवघ्या एका महिन्यात पूर्ण केलीत. आता याच पद्धतीने लक्ष घातल्यास पुढील दोन वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होईल आणि ५० हजार एकर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लागेल," असे ते म्हणाले. याचवेळी लेंडी प्रकल्पाप्रमाणेच गोदावरी मनार साखर कारखान्याचा प्रश्नही मार्गी लावावा, केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्याशी बोलून हा प्रश्न सोडवावा." अशी विनंती करत खतगावकरांनी यावेळी केली.

"अजितदादा, तुम्ही नांदेड जिल्ह्यात तिसऱ्यांदा आलात, तेव्हा काही मागण्याचा मोह आवरत नाही," असे म्हणत माजी मंत्री भास्कर पाटील खतगावकर यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. यावेळी त्यांनी सौम्य चिमटाही घेतला. "अशोकाच्या झाडाकडून काही अपेक्षा नसते, तसेच अशोक चव्हाण यांच्याकडूनही फारशा अपेक्षा नाहीत," असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे टोला लगावला.

# हवाई वाहतूक क्षेत्रात तरुणांना संधी!

## केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे पुण्यात प्रतिपादन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'गुणवत्ता व अभिनवतेचे शहर ही कायमच पुण्याची ओळख राहिलेली आहे. उडाण योजनेंतर्गत हवाई जोडणीचा विस्तार आणि प्रवासी वाहतुकीतील वाढ यामुळे या भागातील तरुणांना योग्य वेळी कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होत आहेत,' असे प्रतिपादन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी केले.**



विमानवाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्य विकासासाठी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'ची प्रशिक्षण शाखा असलेल्या 'ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन'तर्फे प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'च्या व्यवस्थापकीय संचालिका सरिता कुमारी उपस्थित होत्या. 'एरोमॉल'मध्ये हे प्रशिक्षण केंद्र सुरू झाले असून, त्यात विमानचालन प्रशिक्षण मिळणार आहे.'ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन'च्या पुण्यातील केंद्रात विमानतळ ग्राउंड हँडलिंग, केबिन क्रू प्रशिक्षण, विमानतळ संचालन व व्यवस्थापन या विषयाचे पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि पदवी अभ्यासक्रम एएमईटी विद्यापीठाच्या सहयोगाने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विमानतळ संचालनाच्या प्रक्रियेचा थेट आणि प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. प्रशिक्षणार्थींना ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसच्या तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे,' अशी माहिती सरिता कुमारी यांनी दिली.विमानवाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्य विकासासाठी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'ची प्रशिक्षण शाखा असलेल्या 'ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन'तर्फे प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'च्या व्यवस्थापकीय संचालिका सरिता कुमारी उपस्थित होत्या. 'एरोमॉल'मध्ये हे प्रशिक्षण केंद्र सुरू झाले असून, त्यात विमानचालन प्रशिक्षण मिळणार आहे.'गुणवत्ता व अभिनवतेचे शहर ही कायमच पुण्याची ओळख राहिलेली आहे. उडाण योजनेंतर्गत हवाई जोडणीचा विस्तार आणि प्रवासी वाहतुकीतील वाढ यामुळे या भागातील तरुणांना योग्य वेळी कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होत आहेत,' असे प्रतिपादन केंद्रीय नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी रविवारी केले.'ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन'च्या पुण्यातील केंद्रात विमानतळ ग्राउंड हँडलिंग, केबिन क्रू प्रशिक्षण, विमानतळ संचालन व व्यवस्थापन या विषयाचे पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम आणि पदवी अभ्यासक्रम एएमईटी विद्यापीठाच्या सहयोगाने उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### प्रत्यक्ष अनुभव घेता येणार

प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विमानतळ संचालनाच्या प्रक्रियेचा थेट आणि प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे. प्रशिक्षणार्थींना ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेसच्या तज्ज्ञांशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे,' अशी माहिती सरिता कुमारी यांनी दिली.विमानवाहतूक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्य विकासासाठी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'ची प्रशिक्षण शाखा असलेल्या 'ग्लोबल स्कूल ऑफ एव्हिएशन'तर्फे प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी 'ग्लोबल फ्लाइट हँडलिंग सर्व्हिसेस'च्या व्यवस्थापकीय संचालिका सरिता कुमारी उपस्थित होत्या. 'एरोमॉल'मध्ये हे प्रशिक्षण केंद्र सुरू झाले.

# शाळांतील 'पोस्ट मॅपिंग' पूर्ण करण्याचे निर्देश

## महिन्याचे वेतन शालार्थ प्रणालीद्वारे दिले जाणार नसल्याचा इशारा

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातील माध्यमिक शाळांतील संचमान्यतेनंतर सर्व पदांच्या मॅपिंगची प्रक्रिया जूनमध्ये, तर उच्च माध्यमिकची मॅपिंगची प्रक्रिया जुलैमध्ये पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दिलेल्या मुदतीनुसार प्रक्रिया पूर्ण न केल्यास संबंधित महिन्याचे वेतन शालार्थ प्रणालीद्वारे दिले जाणार नसल्याचा इशाराही देण्यात आला आहे.**



माध्यमिक व उच्च माध्यमिक सहसंचालक श्रीराम पानझाडे यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. संचमान्यतेमध्ये शाळांतील पटसंख्येनुसार मंजूर शिक्षक पदांची मान्यता प्रक्रिया राबवली जाते. मंजूर असलेल्या पदांची जोडणी शालार्थ प्रणालीवर करण्यात येते. या अनुषंगाने राज्यातील माध्यमिक शाळांच्या (अनुदानित, अंशत: अनुदानित) २०२४-२५ शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेच्या आधारे पोस्ट मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण होत आहे. त्यानुसार एनआयसीकडील संचमान्यता 'एपीआय'चा वापर करून संचमान्यता आणि शालार्थ प्रणाली यांच्या आधारे शालार्थ प्रणाली अद्ययावत करण्यात येत आहे. जेणेकरून संचमान्यतेमधील उच्चतम मान्य शिक्षक, शिक्षकेतर पदांपेक्षा अधिक पदांचे वेतन दिले जाणार नाही.

या संदर्भात माध्यमिक शाळांतील 'पोस्ट मॅपिंग'चे कामकाज जूनमध्ये पूर्ण करावे. तसेच, उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेची शालार्थ प्रणालीवर नोंद करण्याची, उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यता पीडीएफ स्वरूपात अपलोड करण्याची सुविधा शालार्थ प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेच्या आधारे शालार्थ प्रणालीमध्ये संचमान्यतेच्या उच्चतम मान्य पदांपेक्षा अधिक पदांचे वेतन दिले जाणार नाही यासाठी आवश्यक ते बदल करण्यात येत आहेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.दरम्यान, 'सर्व पदे अधिकृत असल्यास शाळांनी मॅपिंगची प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे गरजेचे आहे. काही त्रुटी असल्यास त्या या प्रक्रियेतून निदर्शनास येतील. त्या दृष्टीने ही प्रक्रिया महत्त्वाची आहे,' असे माजी मुख्याध्यापक महेंद्र गणपुले यांनी सांगितले.माध्यमिक व उच्च माध्यमिक सहसंचालक श्रीराम पानझाडे यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. संचमान्यतेमध्ये शाळांतील पटसंख्येनुसार मंजूर शिक्षक पदांची मान्यता प्रक्रिया राबवली जाते. मंजूर असलेल्या पदांची जोडणी शालार्थ प्रणालीवर करण्यात येते. या अनुषंगाने राज्यातील माध्यमिक शाळांच्या (अनुदानित, अंशत: अनुदानित) २०२४-२५ शैक्षणिक वर्षाच्या संचमान्यतेच्या आधारे पोस्ट मॅपिंगची प्रक्रिया पूर्ण होत आहे. त्यानुसार एनआयसीकडील संचमान्यता 'एपीआय'चा वापर करून संचमान्यता आणि शालार्थ प्रणाली यांच्या आधारे शालार्थ प्रणाली अद्ययावत करण्यात येत आहे.

### अधिक पदांचे वेतन दिले जाणार नाही

उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेची शालार्थ प्रणालीवर नोंद करण्याची, उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यता पीडीएफ स्वरूपात अपलोड करण्याची सुविधा शालार्थ प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. या उच्च माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेच्या आधारे शालार्थ प्रणालीमध्ये संचमान्यतेच्या उच्चतम मान्य पदांपेक्षा अधिक पदांचे वेतन दिले जाणार नाही.

## पालिकेला तिसऱ्यांदा नोटीस

# मुळा नदी सुधार प्रकल्प पालिकेला भोवणार!

## पहिल्याच पावसाने पिंपळे निलख भागातील नागरिकांच्या घरात पाणी

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्प सुरू आहे. हा प्रकल्प पालिकेला भोवण्याची शक्यता आहे. या प्रकल्पासाठी नदीमध्ये भराव टाकून अरुंद करण्याचे काम सुरू आहे. यासंदर्भात पर्यावरणवादी संघटनांनी आक्षेप नोंदवल्यानंतर जलसंपदा विभागाने महापालिकेला तिसऱ्यांदा नोटीस दिली आहे. दरम्यान पर्यावरणवाद्यांनी ओळखलेला धोका पहिल्याच पावसाने खरा करून दाखवला. दोन दिवस शहरात झालेल्या पावसामुळे मुळा नदीलगतच्या पिंपळे निलख भागातील घरांमध्ये पाणी शिरले.**

महापालिकेच्या वतीने शहराच्या बाजूने मुळा नदीच्या सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. त्यासाठी वृक्षतोड आणि नदीमध्ये भराव टाकून काम सुरू आहे. याविरोधात पर्यावरणवादी संघटनांनी जोरदार आवाज उठवला आहे. पर्यावरणवादी संघटनांनी जलसंपदा विभागाकडे तक्रार केल्यानंतर महिन्याभरात तिसऱ्यांदा महापालिकेला नोटीस देण्यात आली आहे.



### संभाव्य पुरामुळे जीवित व वित्तहानी

नदी प्रवाहात कोणताही अडथळा येणार नाही, नदीची वहन क्षमता कमी होणार नाही व नदीच्या काटछेदात कोणताही बदल होणार नाही, याची दक्षता घ्यावी. प्रवाहाला अडथळा आणणाऱ्या बांधकामाविरुद्ध मुख्य अभियंता कारवाई करतील. संभाव्य पुरामुळे होणाऱ्या जीवित व वित्तहानीस संबंधित विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था जबाबदार राहील, असेही नोटिशीत म्हटले आहे.

### पहिल्याच पावसाचा फटका

पिंपळे निलखला नदी सुधार प्रकल्पाचा फटका बसला पंचशीलनगरमधील जवळपास ६० घरांमध्ये शनिवारी पाणी शिरले.

परिसरातील मुळा नदीला जोडणाऱ्या सांडपाणी वाहिन्या तुंबल्याने ही आपत्ती ओढवल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. विशालनगरकडून बाणेरकडे जाणाऱ्या पुलाच्या अलीकडे पंचशीलनगर परिसर आहे. या भागामध्ये शुक्रवारी, शनिवारी पावसाने हजेरी लावली. यामुळे रस्त्यांवर व आसपास पाण्याचे डबके साचले. त्यानंतर मैला सांडपाणी वाहिन्या तुंबल्या. यानंतर पंचशीलनगरमधील सुमारे ५० ते ६० घरांमध्ये पाणी शिरले.

### महापालिकेकडून नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा

जलसंपदा विभागाचे विभागाचे कार्यकारी अभियंता दि. म. डुबल यांनी महापालिकेला नोटीस दिली आहे. या नोटीसमध्ये मुळा नदीपात्रात पिंपळे निलख स्मशानभूमीजवळ भराव करून राडारोडा टाकल्याचे व नदीच्या क्षेत्रामधील जागेत अतिक्रमण केल्याचे दिसत आहे. भराव करून नदीच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा निर्माण केला आहे. याबाबत आधी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. हा भाग मुळा नदीच्या निषिद्ध क्षेत्रामध्ये येत आहे. अतिक्रमणांमुळे नदीच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा निर्माण होत असून पूरवहन क्षमतेत बदल होऊन पूरसदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते.

# इंद्रायणीनगर येथे तीन दिवसीय ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

सालाबाद प्रमाणे याही वर्षी श्री साई चौक मित्र मंडळ, श्री विलासभाऊ मडिगेरी प्रतिष्ठान व श्री वैष्णोमाता मंदिर समिती इंद्रायणीनगर, भोसरी यांच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने १२ ते १४ मे २०२५ या कालावधीत ऐतिहासिक वस्तूंचे भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भात पिंपरी चिंचवड महापालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी यांनी माहिती दिली. भोसरी इंद्रायणीनगर येथील वैष्णोमाता मंदिर प्रांगणात हे ऐतिहासिक वस्तूंचे प्रदर्शन होणार असून ते सकाळी १०.०० ते सायंकाळी – ९.०० वाजेपर्यंत खुले राहणार आहे. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची नाणी, स्वराज्याचे स्वाभिमानी चलन शिवराई. मराठा साम्राज्यातील नाणी (१६७४ ते १८१८) विद्यार्थी व इतिहासप्रेमींना पाहता येणार आहेत. नाणी संग्रह किरणकुमार करांडे यांनी केलेला आहे.संतोष चंदने यांनी संग्रहित केलेल्या ऐतिहासिक शिवकालीन शस्त्रांचे देखील प्रदर्शन असणार आहे. यासह इतिहास अभ्यासक व संशोधक कुमार गुरव यांच्यामार्फत गौरवशाली मराठा आरमाराचे व जहाज प्रतिकृतीचे प्रदर्शन इथे असणार आहे. या मराठा आरमाराचा इतिहास प्रदर्शन रुपाने बहुमूल्य ठेवा जनतेसमोर ठेवला जाणार आहे.


भावपूर्ण श्रद्धांजली



कै. श्री. विष्णू (बाळासाहेब) महादेव मातेरे

यांचे शुक्रवार, दि. ०९ मे २०२५ रोजी दु:खद निधन झाले.
ईश्वरचरणी त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, ही प्रार्थना

दशक्रिया विधी :
सोमवार, दि. १२-०५-२०२५ रोजी
सकाळी ८.०० वा.
स्थळ : मोरया गोसावी मंदीराजवळ, पवना नदी काळी, चिंचवड गाव, पुणे

प्रवनकार : ह.भ.प. श्री. चंद्रकांतजी महाराज वांजळे
शोकाकुल : श्रीमती सिंधु विष्णू मातेरे (पत्नी)

श्री. रोहित विष्णू मातेरे (मुलगा) — सौ. माधवी रोहित मातेरे (सून)
श्री. किसनराव महादेव मातेरे (भाऊ) — श्री. अनंतराव महादेव मातेरे (भाऊ)
श्री. श्रीकांत गुलाबराव मातेरे (पुतणे) — श्री. प्रशांत गुलाबराव मातेरे (पुतणे)
श्री. प्रविण मारुतीराव मातेरे (पुतणे) — श्री. महेश मारुतीराव मातेरे (पुतणे)
श्री. अमित किसनराव मातेरे (पुतणे) — श्री. अतुल किसनराव मातेरे (पुतणे)
कु. शुभय रोहित मातेरे (नातू) — कु. शिवेंद्र रोहित मातेरे (नातू)

शोकाकुल :
समस्त मातेरे, पडवळ, पायमोडे, गोंदकर, सदाफळ, वाघेरे, सिनारे परिवार व आप्तेष्ट, समस्त ग्रामस्थ बाभुळवडे



## भूमिका

**'ऑपरेशन सिंदूर' असे अर्थगर्भित नामकरण झालेली मर्यादित लष्करी मोहीम भारतीय सैन्यदलांनी ६ मेच्या मध्यरात्रीनंतर सुरू केली आणि अवघ्या २५ मिनिटांमध्ये सुफळ संपूर्ण केली. दुसऱ्या दिवशी देशभर उत्तर आणि पश्चिम भागांमध्ये युद्धप्रतिकारात्मक सराव प्रात्यक्षिके नियोजित होती. ती झाल्यानंतर, पुरेशा तयारीनिशी भारत प्रतिहल्ला करेल अशी पाकिस्तानची अटकळ होती.**

# दहशतवादाचा दमनदिन!




पण या प्रात्यक्षिकांच्या आदल्याच मध्यरात्री हल्ले करून भारताने शत्रूला गाफील गाठले. तत्परता हा कोणत्याही युद्धकारवाईच्या यशस्वितेचा पहिला टप्पा असतो.भारत १०० टक्के यशस्वी झाला. यंदाच्या हल्ल्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, १९७१ नंतर प्रथमच भारताने पाकिस्तानातील पंजाब प्रांतात हल्ले केले. हे धाडस विशेषच. पाकव्याप्त काश्मीरमध्ये भारताने यापूर्वीही हल्ले केलेले आहेत. 'सर्जिकल स्ट्राइक' हे त्यांपैकी एक उदाहरण. याही वेळी पाकव्याप्त काश्मीरमध्ये मुझफ्फराबाद, कोटली अशा ठिकाणांवर आपण प्रहार केले. पण नऊपैकी पाच ठिकाणे ही पंजाबमधील आहेत. बहावलपूर, सियालकोट, मुरीदके या ठिकाणी दहशतवाद्यांचे तळ किंवा जैश, लष्कर- ए- तय्यबासारख्या संघटनांची मुख्यालये यांना लक्ष्य करण्यात आले. पाकव्याप्त काश्मीरला भारताचा सार्वभौम भूभाग आपण मानतो. पण पाकिस्तानमधील पंजाब हा त्या देशाचा वादातीत सार्वभौम भूभाग आहे.

पाकिस्तानी लष्करात आणि राजकारणात त्या पंजाब प्रांताचे नि:संशय आणि अनिर्बंध प्रभुत्व आहे. तेथील भूमीवर हल्ला करून भारताने पाकिस्तानी लष्कर आणि पाकिस्तानी राज्यकर्त्यांना इशारा दिला हे महत्त्वाचे. पाकिस्तानचे विद्यामान पंतप्रधान शाहबाझ शरीफ आणि विद्यामान लष्करप्रमुख असिम मुनीर हे पंजाबचेच. याच पंजाबमध्ये लष्कर- ए- तय्यबा, जैश- ए- मोहम्मद या दहशतवादी संघटनांची मुख्यालये आहेत. तेथे हाफीझ सईद, मसूद अझर हे दहशतवादी म्होरके आजही उजळ माथ्याने फिरत आहेत. भारतीय क्षेपणास्त्रे पंजाबपर्यंत पोहोचू शकतात म्हणजे ती या मंडळींपर्यंतही पोहोचू शकतात हा संदेश 'ऑपरेशन सिंदूर'मधून भारताने दिलेला आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार ही कारवाई नेमकी, मर्यादित आणि युद्धभडका टाळणारी होती. या कारवाईचे उद्दिष्ट केवळ दहशतवाद्यांचा नि:पात आणि पाकिस्तानास जरब बसवणे इतके मर्यादित होते. पण तिची व्याप्ती ही उरीनंतर झालेले सर्जिकल स्ट्राइक आणि पुलवामापश्चात बालाकोटमध्ये झालेले हवाई हल्ले यांच्यापेक्षा अधिक होती. भारताने या वेळी नऊ ठिकाणी हल्ले केले. ते करताना कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानच्या लष्करी आस्थापना किंवा नागरी वस्त्यांना झळ पोहोचणार नाही याची दक्षता घेतली. असे केल्यामुळे पाकिस्तानची पंचाईत झाली हे नक्की. भारतात दहशतवादी पाठवण्यासाठी डझनभर तळ सीमावर्ती भागांतच नव्हे, तर पाकिस्तानच्या अंतर्गत भागामध्येही उभारले गेले हे यातून उघड झालेच. मालकी सांगून भारताचा निषेध करणे हीदेखील नामुष्कीच. ही चरफड त्या देशाच्या नेतृत्वाकडून प्रसृत झालेल्या प्रतिक्रियांमध्ये उमटलेली दिसते. अगदी सुरुवातीला पाकिस्तानकडून 'भारताची काही लढाऊ विमाने पाडली' या स्वरूपाची दिशाभूल करणारी वक्तव्ये पेरली गेली. त्यानंतर 'भारताला क्षणैक आनंद साजरा करू दे. पण दीर्घकालीन दु:ख त्यांस भोगायला लावू' अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटू लागल्या.पण या वल्गनावजा प्रतिक्रियांपेक्षा वेगळे आणि अधिक हा देश काय करू शकतो? दहशतवादास, धर्मांधवादास कवटाळल्यामुळे त्या देशाच्या वाटेला यापेक्षा वेगळे भोग येणार नव्हतेच. दहशतवादविरोधी जागतिक लढ्यामध्ये ९/११ च्या हल्ल्यानंतर पाकिस्तानला सहकारी म्हणून बरोबर घेण्याचे हास्यास्पद धोरण तत्कालीन अमेरिकी अध्यक्ष धाकटे जॉर्ज बुश यांनी अंगीकारले, त्याच वेळी भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी इशारा दिला होता,'अफगाणिस्तान नव्हे, पाकिस्तान हाच जागतिक दहशतवादाचा केंद्रबिंदू आहे'! ही घटना २००१ मधील. त्यानंतर दहाच वर्षांनी दहशतवादनाट्यातील मुख्य खलनायक ओसामा बिन लादेन भर पाकिस्तानात, त्यांची राजधानी इस्लामाबादपासून जवळ असलेल्या अबोटाबाद येथे मारला गेला.

## प्रासंगिक »

# संधी साधणे!

***प्रतिमासंवर्धनासाठी संघर्ष सुरूच ठेवणे जसे पाकिस्तानी लष्कराला आवश्यक होते तसे पाकिस्तानला 'सरळ' करणे आपल्या राजकारण्यांसाठी गरजेचे होते...***

तसे पाहायला गेल्यास आंतरराष्ट्रीय संघर्षांच्या बाबतीत डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकेचे सर्वाधिक निरिच्छ अध्यक्ष ठरू शकतात. 'त्यांचे त्यांनी पाहून घ्यावे' हे त्यांचे परवलीचे शब्द. तरीही त्यांनी रशिया व युक्रेन, तसेच इस्रायल व हमास यांच्यात शस्त्रसंधीहे महाशय ताज्या भारत-पाकिस्तान संघर्षाविषयी सुरुवातीला 'दोन्ही देश लवकरात लवकर मिटवून टाकतील' असे म्हणून गेले. त्यांचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स यांनीदेखील 'या संघर्षाशी आम्हाला काही देणेघेणे नाही' असे विधान शस्त्रसंधी जाहीर होण्याच्या साधारण ४८ तास आधी केले होते. प्रत्यक्षात ट्रम्प यांनीच त्यांच्या 'ट्रुथ सोशल' समाजमाध्यम व्यासपीठावरून शनिवारी सायंकाळी शस्त्रसंधीची घोषणा पहिल्यांदा केली.

दिल्लीत भाजपच्या राष्ट्रीय स्तरावरील नेत्याकडे खासगी गप्पा रंगल्या होत्या. त्या गप्पांच्या ओघात विषय भारत-पाकिस्तान युद्धाकडे गेला. दोन्ही देशांमध्ये आरपारची लढाई होऊ शकते का, भारताला खरेच ती करायची आहे का, असे उपविषय निघत गेले. भाजपच्या नेत्याचे म्हणणे होते की, पाकिस्तानला धडा शिकवलाच पाहिजे.

# 'आरपार'च्या आधीचे शहाणपण!



वेळोवेळी तो आपण शिकवलाही आहे; पण आपल्याला पाकिस्तानविरोधातील युद्धामध्ये सतत अडकून पडायचे नाही... भाजपच्या या नेत्याचे हे शहाणपणाचे बोल होते. या नेत्याने ही अचंबित करणारी भूमिका समजून सांगण्याचा प्रयत्न केला. हा नेता म्हणत होता की, गेल्या दहा-बारा वर्षांमध्ये भारत इतका बदलला आहे की, आता भारत आणि पाकिस्तानची तुलना होऊ शकत नाही. आपल्याला २०४७ मध्ये विकसित देश व्हायचे आहे, हेच आपले लक्ष्य असले पाहिजे. तसे जर आपण केले नाही तर आपण मागे पडू. पाकिस्तानचे दहशतवादी आपण मारत राहू, पण तेवढेच ते पुन्हा जन्माला घालतील. त्यांना मरण्यामध्ये धन्यता वाटते, आपल्याला देशाचा विकास घडवायचा आहे. पाकिस्तानने कुरापती केल्या तर त्याला भारत प्रत्युत्तर देईल, पण पाकिस्तानच्या समस्या आपण आपल्या डोक्यावर कशाला घ्यायच्या, असा या नेत्याचा सवाल होता. भाजपच्या या नेत्याचा युक्तिवाद अजिबात चुकीचा नव्हता. भाजपचे नेते जाहीरपणे बोलत असलेली आक्रमक युद्धखोर भाषा या नेत्याने वापरलेली नव्हती. हा नेता खासगी गप्पा मारत असल्यामुळेही त्यांनी एकप्रकारे केंद्र सरकारची भूमिका मांडली असावी. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले. पण आरपारची लढाई होण्याआधीच शस्त्रसंधीचा पाकिस्तानचा प्रस्ताव, खरेतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा प्रस्ताव भारताने लगेच मान्य करून टाकला. भाजपचे राष्ट्रीय नेते (ते मोदींच्या विश्वासातील आहेत!), जे सांगत होते ते तंतोतंत खरे ठरले असे म्हणता येईल. प्रसारमाध्यमे व समाजमाध्यमांतून युद्धखोरी परवडू शकते, प्रत्यक्षात युद्ध भारताचे मोठे आर्थिक नुकसान करून जाईल हे वेळीच ओळखून मोदी सरकारने आपला हात आखडता घेतला असावा. मोदी सरकारने दाखवलेली परिपक्वता कदाचित भाजपच्या पाठीराख्यांना वा भक्तांना आवडणार नाही; पण पाकिस्तानला खरेतर इतपतच (दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त करणे वगैरे) धडा शिकवणे मोदी सरकारला शक्य होते, हे वास्तव लपून राहात नाही!दिल्लीतील शनिवारचा दिवस म्हणजे 'ॲण्टिक्लायमॅक्स' होता. 'सरकारी सूत्रांकडून' असे म्हणत परराष्ट्र मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयातून अनेक वृत्तसंदेश प्रसारित करण्यात आले. परराष्ट्र मंत्रालय आणि संरक्षण दलांची संयुक्त पत्रकार परिषद सकाळी साडेपाच वाजता होणार होती. पण नंतर ती साडेदहा वाजता झाली.

## ।। अभंगवाणी ।।




आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### थोडे वाचावे पण कृतीत आणावे

खूप समजून घ्यावे, ज्ञान संपादन करावे, असा पुष्कळ लोकांना हव्यास असतो, आणि त्याच्याशिवाय त्यांना चैन पडत नाही. हे एक प्रकारचे व्यसनच आहे. अफू खाणाऱ्याला कैफ आल्याशिवाय चैन पडत नाही. थोडी अफू पचनी पडली की, कैफ येत नाही म्हणून तो आणखी अफू कैफ येईपर्यंत खातो. असे होता होता अधिकाधिक अफू पचनी पडत जाते, आणि शेवटी इतकी अफू खाण्याची वेळ येते की त्यातच त्याचा अंत होतो. ज्ञानसंपादनाच्या हव्यासाचे असेच आहे; म्हणून, थोडेच वाचून, समजून घ्यावे, आणि ते कृतीत आणावे. नाही तर जन्मभर ज्ञान संपादण्यात वेळ जातो, आणि कृती न झाल्याकारणाने पदरात काहीच पडत नाही. मनुष्याला पोटभर जेवायला पंचवीस-तीस मिनिटे पुरेशी होतात; पण जेवलेल्या अन्नाचे पचन होण्यासाठी पाचसहा तास जावे लागतात. मनुष्य एकसारखा जर खातच राहिला तर त्याला अजीर्ण होऊन तब्येत बिघडेल, आणि त्यातच त्याचा अंत होईल. म्हणून नुसते वाचीतच बसू नये. थोडेच वाचावे, पण ते कृतीत आणण्याचा प्रयत्न करावा. नुसत्या वाचनाने किंवा विषय समजावून घेण्याने प्रगती होत नसून, ते कृतीत आणण्याने प्रगती होते. म्हणून केवळ समजावून घेण्यापेक्षा, ते कृतीत आणण्यावर भर असावा. आपले आकुंचित मन विशाल करणे, आपण स्वार्थी आहोत ते नि:स्वार्थी बनणे, हेच खऱ्या वेदान्ताचे मर्म आहे. नुसत्या विचाराने तत्त्वज्ञान निश्चित होणार नाही; त्यासाठी साधना करायला पाहिजे. जग सुधारायच्या नादी लागू नका; स्वत:ला सुधारा की त्या मानाने जग सुधारेलच. आपण सुधारलो नाही तर मग जग सुधारले नाहीच ! वस्तू ही सुखाचे साधन असून आपण भ्रमाने तिलाच सुखरूप मानतो. याचा परिणाम असा होतो की, वस्तूच्या सहाय्याने सुख मिळविण्याचा प्रयत्न करण्याऐवजी आपण वस्तूच जास्त जास्त मिळविण्याच्या मागे लागतो, आणि शेवटी दु:खी बनतो. कर्माला सुरुवात करताना, फळ मिळते किंवा नाही म्हणून काळजी आणि दु:ख होते; कर्म करीत असताना, फळाकडे चित्त लागल्याने कर्माचे कष्ट होतात म्हणून दु:ख होते; कर्म संपून, फळ मिळाले नाही तर दु:ख होते; आणि फळ मिळालेच, तर त्यातून नवीन आशा उत्पन्न होऊन, फळ मिळाल्याचा आनंद ती मारून टाकते म्हणून दु:ख होते. सारांश, अथपासून इतिपर्यंत दु:खच पदरात पडते. यासाठी, फळाची अपेक्षा सोडून कर्म करू लागलो की ते कर्म करीत असतानाच मनाला समाधान प्राप्त होते. म्हणून परमार्थामध्ये रोकडा व्यवहार आहे, उधारीचा नाही, असे सर्व संतांचे सांगणे आहे.

**बोधवचन:- अधिक वाचू नका, जे काही थोडे वाचाल, त्याचे मनन करा, आणि ते कृतीत आणा.**

# स्वतंत्र बलुचिस्तानचे 'स्वप्न साकार', पाकच्या भूमीचा घटणार आकार!



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**पाकिस्तानच्या जुलमी जोखडातून स्वतंत्र होण्याचे स्वप्न उराशी बाळगून वर्षानुवर्षे लढा देणाऱ्या बलुचिस्तानचे स्वप्न अखेर साकारण्याची शक्यता निर्माण झाली आहे. स्वातंत्र्यापासून हा प्रदेश कधीच पाकिस्तानशी एकनिष्ठ राहिला नाही आणि गेली सुमारे ७५ वर्षे तो पाकिस्तानच्या हुकूमशाही राजवटीची झुंजत राहिला आहे.**



### बलुचिस्तानची आशा नरेंद्र मोदी..

भारतामध्ये २०१४ साली भारतीय जनता पार्टीचे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आल्यापासून बलुचिस्तानची स्वतंत्र राष्ट्र होण्याची आशा पल्लवीत झाली होती आणि त्यांचे सर्व लक्ष भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केंद्रित झाले होते. भारतात नरेंद्र मोदी यांना ज्या ज्या वेळी यश मिळत होते, त्या त्यावेळी बलुचिस्तानमध्ये मिरवणुका निघत आणि 'मोदी मोदी' नाऱ्याचा जयघोष होत असे. आता मोदी सरकारकडून ज्यावेळी पाकिस्तानच्या दहशतवादी अड्ड्यांवर कारवाई करण्यात आली, त्यावेळी त्यांच्या आशा अशाच पल्लवीत झाल्या !

### पाक सैनिक हे तर मोठे शत्रू..

बलुचिस्तानवर ताबा राखण्यासाठी आणि तेथील जनतेला नियंत्रणात ठेवण्यासाठी जे सैनिक पाकिस्तानकडून पाठवले जात असत, ते तर या बलोची नागरिकांचे सर्वात मोठे शत्रू ! पाकिस्तानी सैन्याची नुकतीच त्यांनी एक रेल्वे उडवून दिली, त्यात शेकडो सैनिक मारले गेले आणि आता भारताकडून कारवाई होत असल्याचे समजतात त्यांच्या स्वयंघोषित संघटनांनी उचल खाल्ली आणि बघता बघता आपला प्रांत स्वतंत्र केल्याची घोषणा केली..स्वतंत्र बलुचिस्तानला अजून आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता नसली तरी हे काम नरेंद्र मोदी करणार याची त्यांना खात्री आहे !

### स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा..

बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढा देणाऱ्या संघटनांनी एकत्र येऊन संपूर्ण परिसराचा ताबा घेतल्याची घोषणा तसेच स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणाही करून टाकली आहे. आमच्या देशाचा दिल्लीत लवकरच दूतावास असेल आणि त्याबाबत संयुक्त राष्ट्राकडे प्रस्ताव पाठवला आहे, असे त्यांनी आपल्या घोषणेत म्हटले आहे. पाकिस्तानला हा आणखी एक दणका असून पाकिस्तान चांगलाच कोंडीत सापडला आहे.

### पाकिस्तानच्या चौक्यांवर हल्ले आणि ताबा..

एकीकडे भारतीय लष्कराने पाकला चोख प्रत्युत्तर दिले आहे तर दुसरीकडे 'बलुच लिबरेशन आर्मी' ने पाकिस्तानी सैन्याच्या चौक्यांवर मोठा हल्ला चढवला आहे, ताबा घेतला आहे आणि त्यांच्या नेत्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे, हा पाकिस्तानला मोठा हादराच आहे. आता, पाकिस्तानची युद्धाची खुमखुमी चांगलीच जिरणार आहे. पाकिस्तानचे दोन तुकडे होण्याची दाट शक्यता आहे. भारतीय लष्कराने पाकिस्तानवर चढाई केल्यानंतर आता बलुच लिबरेशन आर्मीला सुद्धा सत्तर हत्तींचे बळ आले आहे. बलुच लिबरेशन आर्मीने पाकिस्तानी सैन्याच्या चौक्या ताब्यात घेतल्या आहेत. यामुळे पाकिस्तानचे कंबरडे मोडणार, हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

### मीर यार बलोच यांची घोषणा..

भारत आणि पाक यांच्यात हल्ले-प्रतिहल्ले सुरू असतानाच बलुच लेखक मीर यार बलोच यांनी स्वतंत्र बलुचिस्तानची घोषणा केली आहे. सोशल मीडिया एक्सपोर्ट 'एक्स' वर त्यांनी लांबलचक पोस्ट लिहिली आहे. त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे, संयुक्त राष्ट्राकडे शांती पथक पाठवण्याची विनंती करत बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याचा प्रस्ताव दिला आहे. बलुच लिबरेशन आर्मीने बलुचिस्तानमधील अनेक शहर आणि परिसरावर कधीचाच ताबा मिळवला आहे. या भागातील शाळा, महाविद्यालये, सरकारी आस्थापनातील पाकिस्तानी झेंडे फेकून देण्यात आले आहेत, तर दुसरीकडे येथे पाकिस्तानी राष्ट्रगीताला बंदी घालण्यात आली आहे. त्यांचा कारभार एखाद्या स्वतंत्र राष्ट्रासारखा सुरू झाला आहे.

### स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता द्या..

संयुक्त राष्ट्र संघाने बलुचिस्तान स्वातंत्र्याविषयीचा प्रस्ताव मंजूर करावा. बलुचिस्तानला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता द्यावी, संयुक्त राष्ट्राने सर्व सदस्य देशांची एक बैठक बोलावावी आणि बलुचिस्तानाला मान्यता द्यावी अशी मागणी करण्यात आली आहे. तर बलुचिस्तानचे नवीन चलन आणि पासपोर्टसाठी सहकार्य करण्याची विनंती सुद्धा करण्यात आली आहे. स्वतंत्र व्यवसाय त्यांनी सुरू केला आहेच. पण, स्वतःच्या स्वतंत्र चलनाबाबतही मोठी झेप घेतली आहे.

### दिल्लीत दूतावास उघडणार..

या संपूर्ण लढ्याचे नेते मीर यार बलोच यांनी दहशतवादी पाकिस्तानचे पतन आता जवळ आल्याचे म्हटले आहे. पाकिस्तानची फाळणी निश्चित असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांनी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याची घोषणा केली आहे. दिल्लीत बलुचिस्तानचा दूतावास आणि अधिकृत कार्यालय सुरू करण्याची परवानगी द्यावी, अशी विनंती त्यांनी भारत सरकारकडे केली आहे. त्यावर काय निर्णय घ्यायचा याबाबत भारताच्या नेत्यांमध्ये लवकरच चर्चा सुरू होईल.

### पाक लष्कराने भूभाग सोडावा..

पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानच्या सर्वच क्षेत्रातून माघार घ्यावी. हा भूभाग सोडावा, हवाई, समुद्र आणि जमिनीवरील सर्व हालचाली थांबवाव्यात. बलुचिस्तानमधून काढता पाय घ्यावा, तसेच संयुक्त राष्ट्र संघाने त्यांचे प्रतिनिधी मंडळ पाठवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. बलुचिस्तानच्या नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधी लवकरच घेण्यात येईल, असे मीर यार यांनी स्पष्ट केले आहे. या मंत्रिमंडळात महिलांचे प्रतिनिधित्व लक्षणीय असेल याची त्यांनी हमी दिली आहे. मित्र राष्ट्रांच्या प्रमुखांना या स्वातंत्र्य सोहळ्यासाठी आमंत्रण पाठवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### पाकला मोठा धडा असेल !

दहशतवाद्यांची फॅक्टरी असणाऱ्या पाकिस्तानला स्वतःच्या ताकदीबद्दल प्रचंड अहंगंड आहे. त्यांची जिरवायची असेल तर भारताने आता पाकव्याप्त काश्मीर मोकळा करावा, बलुचिस्तान स्वतंत्र करावा आणि सिंध प्रांतामध्ये लढा सुरू असल्याने तो भूभागही पाकिस्तानपासून तोडावा.. म्हणजे पाकिस्तानचे एवढे तुकडे झाल्यानंतर त्यांची मस्ती जिरेल आणि दहशतवाद्यांची फॅक्टरी बंद पडेल, अशी मागणी संपूर्ण जगातून होत आहे. त्याला भारत आता कसा प्रतिसाद देणार, हे पाहणे मात्र महत्त्वाचे आहे !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक ः MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक ः वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक ः सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जगण्याचे वास्तव साहित्यिकांनी मांडावे!

## साहित्यिकांनी लिखाण समाजाच्या हितासाठी करावे : शेट्टी

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**शेतकऱ्यांच्या जगण्याचे वास्तव साहित्यिकांनी समाजासमोर मांडले पाहिजे, साहित्यिकांनी आपले लिखाण पुरस्कारासाठी नव्हेतर समाजाच्या हितासाठी करावे, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते, माजी खासदार राजू शेट्टी यांनी केले.**



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित नवोदित साहित्य संमेलनात 'कृषक समाज काल, आज आणि उद्या' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. शरद गोरे, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल राजेपवार, शेतीमित्र अशोक थोरात, कराड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रकाश पाटील, संचालक नितीन ढापरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.राजू शेट्टी म्हणाले, भारतीय संस्कृतीचा उदय शेतकऱ्यांपासून झाला. पण, राज्यकर्ते, शासकीय व्यवस्थेच्या भावना बोथटपणामुळे शेतकरी वर्षानुवर्षे अन्याय सहन करत आहे. भांडवलदाराने शेतकऱ्यांना लुटण्याचे काम आजवर केले. स्वामिनाथन, सुब्रमण्यम यांनी देशात हरितक्रांती आणली. शेतकऱ्यांनी समृद्धी आणली. त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. साहित्यिकांनी शेतकऱ्यांचे चित्र योग्य पद्धतीने रंगवले नाही. गोरगरिबांचे शोषण करणारा, फेटा उडवणार शेतकरी अशा पद्धतीचे चित्रण मराठी साहित्यात व चित्रपटात रंगवले गेले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जगण्याचे वास्तव साहित्यिकांनी समाजासमोर मांडले पाहिजे अशी अपेक्षा शेट्टी यांनी व्यक्त केली.शरद जोशी म्हणायचे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण आहे. आसमानी संकटाचा सामना करत शेतकरी शेती करताना सरकार सुलतानी संकट त्यांच्यावर लादत आहे. शेतकरी आतबट्ट्यात येत असून, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटल्यास त्या अनुषंगाने सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन तसे कायदे करायला हवेत, अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली. डॉ. शरद गोरे, विठ्ठल राजेपवार यांनी आपले विचार माडले.शेतमालाला रास्त हमीभाव मिळण्याची मागणी करताना, राजू शेट्टी म्हणाले, राज्यकर्त्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतमालाला भाव मिळत नाही. शेतीमालाच्या दरावर नियंत्रण करण्याचा कायदा सरकारने केला असला, तरी शेतमालाला उत्पादन खर्चावर हमीभाव देण्याची जबाबदारीही सरकारची आहे. बाजारपेठेवर शेतकऱ्यांचे नियंत्रण नाही, तंत्रज्ञानाच्या वापरावर निर्बंध लादले जात आहेत. हमीभावापेक्षा कमी भावाने शेतमाल खरेदी करणे कायद्याने गुन्हा आहे. त्याची अंमलबजावणी सरकारने करावी अशी मागणी राजू शेट्टी यांनी या वेळी केली.अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित नवोदित साहित्य संमेलनात 'कृषक समाज काल, आज आणि उद्या' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते. साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. शरद गोरे, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल राजेपवार, शेतीमित्र अशोक थोरात, कराड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती प्रकाश पाटील, संचालक नितीन ढापरे आदींची प्रमुख उपस्थिती होती.राजू शेट्टी म्हणाले, भारतीय संस्कृतीचा उदय शेतकऱ्यांपासून झाला. पण, राज्यकर्ते, शासकीय व्यवस्थेच्या भावना बोथटपणामुळे शेतकरी वर्षानुवर्षे अन्याय सहन करत आहे. भांडवलदाराने शेतकऱ्यांना लुटण्याचे काम आजवर केले. स्वामिनाथन, सुब्रमण्यम यांनी देशात हरितक्रांती आणली. शेतकऱ्यांनी समृद्धी आणली. त्यांची अवस्था दयनीय झाली आहे. साहित्यिकांनी शेतकऱ्यांचे चित्र योग्य पद्धतीने रंगवले नाही. गोरगरिबांचे शोषण करणारा, फेटा उडवणार शेतकरी अशा पद्धतीचे चित्रण मराठी साहित्यात व चित्रपटात रंगवले गेले.

### हमीभावची सरकारची जबाबदारी

त्यामुळे शेतकऱ्यांच्या जगण्याचे वास्तव साहित्यिकांनी समाजासमोर मांडले पाहिजे अशी अपेक्षा शेट्टी यांनी व्यक्त केली. शरद जोशी म्हणायचे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण आहे. आसमानी संकटाचा सामना करत शेतकरी शेती करताना सरकार सुलतानी संकट त्यांच्यावर लादत आहे. शेतकरी आतबट्ट्यात येत असून, शेतकऱ्यांचे उत्पन्न घटल्यास त्या अनुषंगाने सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन तसे कायदे करायला हवेत, अशी मागणी राजू शेट्टी यांनी केली. डॉ. शरद गोरे, विठ्ठल राजेपवार यांनी आपले विचार माडले.शेतमालाला रास्त हमीभाव मिळण्याची मागणी करताना, राजू शेट्टी म्हणाले.

# पालिकांतून सुरू होणार 'आपले सरकार' सेवा केंद्र

## इतर विभागांच्या ऑनलाइन सेवाही मनपा केंद्रातून मिळणार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महापालिका, नगरपरिषद, नगरपंचायतींमधून आता 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू होणार आहेत. राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने या संदर्भातील आदेश जारी केला आहे. पालिकांमधील आपले सरकार सेवा केंद्रातून राज्य शासनाच्या विविध विभागांनी अधिसूचित केलेल्या सर्व ऑनलाइन सेवांचे ऑनलाइन अर्ज स्वीकारले जातील व त्या संबंधातील सेवा पुरवल्या जातील.**




आपले सरकार सेवा केंद्र यापूर्वी ग्रामपंचायती व खासगी व्यक्तींमार्फत चालवली जात होती. अहिल्यानगर जिल्ह्यात १२४२ ग्रामपंचायती व ८४१ खासगी व्यक्तींमार्फत एकूण २०८३ केंद्र चालवले जातात. या केंद्रांमार्फत राज्य सरकारच्या विविध विभागांच्या अधिसूचित केलेल्या एकूण ७० सेवा ऑनलाइन पद्धतीने दिल्या जातात. आता या सर्व सेवा मनपा, परिषदा, पंचायतीमार्फतही दिल्या जाणार आहेत.राज्यातील सर्व महापालिकांचे आयुक्त तथा प्रशासक, नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारीत सुरू करावयाच्या आपले सरकार सेवा केंद्राची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून जिल्ह्याच्या 'एनआयसी' केंद्राकडून मनपा, नगरपरिषद, नगरपंचायतीच्या नावाने आपले सरकार सेवा केंद्राचे 'युजर आयडी' प्राप्त करून घ्यायचे आहेत. त्याचप्रमाणे आपले सरकार पोर्टल वरून देण्यात येणाऱ्या सर्व सेवांकरता महाआयटी महामंडळाकडून 'युजर आयडी' प्राप्त करून घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत महामंडळाकडे प्रस्ताव पाठवायचे आहेत.महाआयटी महामंडळाने ऑनलाइन अर्जाचे शुल्क स्वीकारण्याकरता संबंधित मनपा, नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या केंद्रांना तत्काळ 'वॉलेट' सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### राज्यात 2083 केंद्र चालवले जातात

शहरातील नागरिकांना सर्वसामावेशक सेवा पुरवणारी केंद्र उपलब्ध होण्यासाठी राज्यसेवा हक्क आयोगाच्या मुख्य आयुक्तांनी तसेच उपमुख्यमंत्र्यांनीही मनपा, परिषद नगरपंचायतीमार्फत केंद्र सुरू करण्याचे सूचित केले होते.२०८३ केंद्र चालवले जातात. या केंद्रांमार्फत राज्य सरकारच्या विविध विभागांच्या अधिसूचित केलेल्या एकूण ७० सेवा ऑनलाइन पध्दतीने दिल्या जातात. आता या सर्व सेवा मनपा, परिषदा, पंचायतीमार्फतही दिल्या जाणार आहेत. राज्यातील सर्व महापालिकांचे आयुक्त तथा प्रशासक, नगरपरिषद व नगरपंचायतींचे मुख्याधिकारी यांनी त्यांच्या अखत्यारीत सुरू करावयाच्या आपले सरकार सेवा केंद्राची यादी जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून जिल्ह्याच्या 'एनआयसी' केंद्राकडून मनपा, नगरपरिषद, नगरपंचायतीच्या नावाने आपले सरकार सेवा केंद्राचे 'युजर आयडी' प्राप्त करून घ्यायचे आहेत.

# ...काही करण्याची हिंमत केली तर!

## भारतीय लष्कराच्या भूमिकेकडे सगळ्यांचं लक्ष लागलं

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**हलगाम दहशतवादी हल्ल्याचा वचपा काढण्यासाठी भारतीय लष्करानं पाकव्याप्त काश्मीर व पाकिस्तानच्या हद्दीत एअर स्ट्राईक केला. त्यापाठोपाठ पाकिस्तानी लष्करानं केलेले ड्रोन हल्ले यशस्वीरीत्या परतवून लावले. शिवाय पाकिस्तानी लष्कराच्या काही तळांवरही भारताच्या हवाई दलानं यशस्वी हल्ले चढवले. अखेर पाकिस्तानं नमतं घेत भारतासमोर शस्त्रविरामाचा प्रस्ताव ठेवला. भारतानंही सहमती दर्शवली. पण अवघ्या काही तासांत पाकिस्ताननं पुन्हा हल्ला केला. या पार्श्वभूमीवर भारतीय नौदलाचे डीजीएमओ व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद यांनी पाकिस्तानला सज्जड दम दिला आहे.**

७ मेच्या मध्यरात्रीपासून १० मेच्या रात्री पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या शस्त्रविरामाच्या उल्लंघनापर्यंतच्या कारवाईची माहिती आज भारतीय लष्करानं घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेसाठी पहिल्यांदाच तिन्ही सैन्यदलांचे डीजीएमओ उपस्थित होते.

उद्या १२ मे रोजी भारत व पाकिस्तान यांच्या डीजीएमओंमध्ये शस्त्रविरामावर होणाऱ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद आणि त्यात भारतीय लष्करानं स्पष्ट केलेली भूमिका महत्त्वाची होती. ७ मेच्या मध्यरात्रीपासून १० मेच्या रात्री पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या शस्त्रविरामाच्या उल्लंघनापर्यंतच्या कारवाईची माहिती आज भारतीय लष्करानं घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली.

या पत्रकार परिषदेसाठी पहिल्यांदाच तिन्ही सैन्यदलांचे डीजीएमओ उपस्थित होते. उद्या १२ मे रोजी भारत व पाकिस्तान यांच्या डीजीएमओंमध्ये शस्त्रविरामावर होणाऱ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद आणि त्यात




भारतीय लष्करानं स्पष्ट केलेली भूमिका महत्त्वाची होती.आर्मीचे डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई, हवाई दलाचे डीजीएमओ एअर मार्शल ए. के. भारती व नौदलाचे डीजीएमओ व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद या पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते.पाकिस्तानचा इतिहास पाहता शस्त्रविरामाचं उल्लंघन आणि पुन्हा आगळीक याचीही शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर पाकिस्ताननं पुन्हा आगळीक केल्यास त्याला युद्धाची कृती मानता येईल का? असा प्रश्न पत्रकार परिषदेत विचारण्यात आला. त्यावर आर्मीचे डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी भूमिका मांडली. "गेल्या काही दिवसांपासून जे काही चाललंय, ते कोणत्याही युद्धापेक्षा कमी नाही. सामान्य परिस्थितीत दोन देशांचे हवाई दल उड्डाण घेत नाहीत.

एकमेकांवर स्ट्राईक करत नाही. दररोज रात्री घुसखोरी होत नाही", असं राजीव घई म्हणाले. "नियंत्रण रेषेवर शस्त्रविरामावर सहमती झाली होती. पण आता तेही पाकिस्तानकडून मोडण्यात आलं आहे.

आता एलओसीवर होत असलेल्या गोळीबारात घुसखोरीचा प्रयत्न होत आहे. पण आम्हाला अशी

### ड्रोन हल्ले परतवून लावले

आज भारतीय लष्करानं घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेसाठी पहिल्यांदाच तिन्ही सैन्यदलांचे डीजीएमओ उपस्थित होते. उद्या १२ मे रोजी भारत व पाकिस्तान यांच्या डीजीएमओंमध्ये शस्त्रविरामावर होणाऱ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद आणि त्यात भारतीय लष्करानं स्पष्ट केलेली भूमिका महत्त्वाची होती.आर्मीचे डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई, हवाई दलाचे डीजीएमओ एअर मार्शल ए. के. भारती व नौदलाचे डीजीएमओ व्हाईस ॲडमिरल ए. एन. प्रमोद या पत्रकार परिषदेसाठी उपस्थित होते.पाकिस्तानचा इतिहास पाहता शस्त्रविरामाचं उल्लंघन आणि पुन्हा आगळीक याचीही शक्यता वर्तवली जात आहे.

माहिती मिळाली आहे की कदाचित हे दहशतवादी नसून पाकिस्तानी लष्कराच्या तुकड्याही असू शकतात. त्यांचा उद्देश आपल्या पोस्टवर हल्ला करण्याचा प्रयत्न असेल. या सगळ्या कृती युद्धाच्याच मानल्या जाऊ शकतात. त्यामुळे पुढे काय होईल, याचा अंदाज बांधता येणार नाही. शिवाय मला कोणताही अंदाज बांधायचा नाहीये. प्रत्येक परिस्थिती वेगळी असते. त्या प्रत्येक परिस्थितीला वेगळ्या प्रकारे तोंड दिलं जातं", असंही त्यांनी सांगितलं.७ मेच्या मध्यरात्रीपासून १० मेच्या रात्री पाकिस्तानकडून करण्यात आलेल्या शस्त्रविरामाच्या उल्लंघनापर्यंतच्या कारवाईची माहिती आज भारतीय लष्करानं घेतलेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेसाठी पहिल्यांदाच तिन्ही सैन्यदलांचे डीजीएमओ उपस्थित होते. उद्या १२ मे रोजी भारत व पाकिस्तान यांच्या डीजीएमओंमध्ये शस्त्रविरामावर होणाऱ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर ही पत्रकार परिषद आणि त्यात भारतीय लष्करानं स्पष्ट केलेली भूमिका महत्त्वाची होती.

# ऑपरेशन सिंदूर आणि शस्त्रविराम!

## काँग्रेसचे नेते राहुल गांधीनी पंतप्रधान मोदी यांना लिहीले पत्र

**। नवी दिल्ली ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी, रविवारी दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहीले आहे. या पत्रात पंतप्रधान मोदी यांच्याकडे सध्याची परिस्थिती, ऑपरेशन सिंदूर आणि पहलगाम दहशतवादी हल्ला यावर चर्चेसाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी करण्यात आली आहे.**

राहुल गांधी त्यांच्या पत्रात म्हणाले की, "संसदेचे विशेष अधिवेशन तात्काळ बोलवण्यात यावे या विरोधकांच्या एकमताने करण्यात आलेल्या मागणीचा



पुनरुच्चार ते करतात. पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि पहिल्यांदा अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष ट्रम्प यांनी जाहीर केलेला आजचा शस्त्रविराम यावर चर्चा करावी हे लोकांसाठी आणि त्यांच्या प्रतिनिधींसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्यासमोर येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठीचा आपला सामूहिक निर्धार दाखवून देण्याची ही एक संधी असेल." राहुल गांधी यांच्यासह राज्यसभेचे विरोधीपक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी देखील एक वेगळे पत्र लिहिले आहे, ज्यामध्ये त्यांनी राहुल गांधी यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.यापूर्वी २८ एप्रिल रोजी दोन्ही नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर विशेष अधिवेशन बोलवण्यासाठी पत्र लिहिले होते.पहलगाम दहशतवादी हल्ला झाल्यानंतर काँग्रेसने केंद्र सरकारच्या निर्णयांना अधिकृतपणे

### विशेष अधिवेशन बोलावावे

याची सरकारने नेहमीच काळजी घेतली आहे. मग ट्रम्प यांनी शस्त्रविरामाची घोषणा कशी केली? येत्या काळात आम्ही हे प्रश्न उपस्थित करू," असे पक्षाच्या एका वरिष्ठ नेत्याने सांगितले. काँग्रेसकडून मागणी केली जात असतानाच राष्ट्रीय जनता दलाचे (RJD) नेते तेजस्वी यादव यांनी देखील सरकारला विशेष अधिवेशन बोलावण्याची विनंती केली आहे. "पंतप्रधानांना विनंती आहे की त्यांनी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावावे आणि पहलगाम हल्ल्यापासून ते शस्त्रविराम याची तारीखेनुसार माहिती द्यावी," असे ते म्हणाले आहेत.भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रविराम झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी, रविवारी दोन्ही सभागृहाच्या विरोधी पक्ष नेत्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे.

पूर्ण पाठिंबा जाहीर केला होता. पण आता पक्षातील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार आता काँग्रेस पक्ष सध्याच्या परिस्थितीबाबत सरकारला प्रश्न विचारणे सुरू करेल. विशेषतः भारत आणि पाकिस्तान यांच्यातील चर्चेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून सरकारला घेरले जाऊ शकते. "भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाटाघाटींमध्ये कोणत्याही तिसऱ्या पक्षाचा हस्तक्षेप होणार नाही .

# दामिनी 'क्लीन बोल्ड'! अर्जुनने बाजी पालटली

'ठरलं तर मग' मालिकेत सध्या अर्जुन प्रियाविरोधात नवनवीन पुरावे गोळा करत असल्याचं पाहायला मिळत आहे. आता मालिकेत कोर्टरुम ड्रामा सुरू झालेला आहे. त्यापूर्वी अर्जुन प्रियाची मानसोपचार तज्ज्ञांसमोर चौकशी करतो. या चौकशीदरम्यान त्याला अनेक गोष्टी नव्याने उलगडतात. डॉक्टरांसमोर केलेल्या चौकशीत अर्जुनच्या हातात प्रियाविषयीची कोणती माहिती लागलीये हे जाणून घेण्यासाठी दामिनी अर्जुन अन् सायलीला घरी जेवणासाठी आमंत्रित करते. पण, अर्जुन वेळीच तिचा सगळा डाव ओळखून तुम्हाला सगळं काही कोर्टात कळेल असं सांगतो.दुसरीकडे, प्रिया कोर्टात जाण्यापूर्वी अर्जुनचं मन वळवण्याचे, त्याला विचलित करण्यासाठी घरात उगाच भांडणं करण्याचा प्रयत्न करते. पण, सायली तिला चांगलंच वठणीवर आणत तिची बोलती बंद करते. आता कोर्टात सर्वांसमोर मोठा उलगडा होणार आहे. विलासचा खून होण्याआधी आपण साक्षी शिखरेला कधीच बाहेर भेटलो नाहीये असं प्रिया सर्वांना सांगत फिरत असते. अगदी रविराज किल्लेदारांना सुद्धा तिने खोटं सांगितलेलं असतं. आता अर्जुन साक्षी आणि प्रियाची आधीपासूनच मैत्री आहे हे कोर्टासमोर सिद्ध करणार आहे. प्रिया आधी सगळ्यांसमोर हे अजिबातच मान्य करत नाही मात्र, त्यानंतर खोटारड्या प्रियाचा खरा चेहरा उघड करण्यासाठी अर्जुन थेट व्हिडीओ क्लिपच सुरू करतो. अर्जुनने कोर्टात सादर केलेल्या व्हिडीओमध्ये साक्षी आणि प्रिया हॉटेलमध्ये बसून काहीतरी देवाणघेवाण करत असल्याचं स्पष्ट पाहायला मिळतं.

# अलका कुबल यांनी सांगितली फुलेंची आठवण

एकापेक्षा एक खलनायकाच्या भूमिका साकारत ज्यांनी प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले, ज्यांनी मराठी सिनेसृष्टीत महत्त्वाचे योगदान दिले, ते म्हणजे दिवंगत अभिनेते निळू फुले. मराठी चित्रपटसृष्टीतील उत्कृष्ट अभिनेते म्हणून निळू फुले यांची ओळख आहे. अनेक कलाकार आजही त्यांच्या आठवणी सांगतात. नुकतीच अलका कुबल यांनी 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी निळू फुले यांच्याविषयी एक आठवण सांगितली. एका सीनचा किस्सा त्यांनी सांगितला. अलका कुबल नेमकं काय म्हणाल्या, हे जाणून घेऊ...या मुलाखतीत अलका कुबल यांना विचारले की, निळू फुलेंबरोबरची अशी कोणती आठवण आहे की तू कायम जपून ठेवली आहेस? यावर अलका कुबल म्हणाल्या, "निळू भाऊ जरी खलनायकाच्या भूमिका करत होते, तरी त्यांचं वाचन दांडगं होतं, त्यांचं बोलणं एवढं छान होतं की ऐकत राहावसं वाटायचं. जेव्हा त्यांना कळलं की मी बाबुराव मुंबरकर यांची नात आहे. बाबुराव मुंबरकर हे आईचे काका होते, तर निळू भाऊ हे बाबुराव मुंबरकर यांचे मित्र होते. त्यानंतर ते माझ्याशी अधिक जोडले गेले."अलका कुबल पुढे म्हणाल्या, "आम्ही सतीश रणदिवेंचा 'रिक्षावाली' चित्रपट करत होतो. मी हा किस्सा सगळीकडे सांगते. अगदी वडिलांसारखे माया करणारे असेच निळू भाऊ मला आठवत होते. तर त्या चित्रपटातील शेवटचा सीन असा होता की, मला निळू भाऊंना चिखलाने माखलेल्या चपलेने थोबाडीत मारायची होती, माझी हिंमतच होत नव्हती.

# सलमान खानने आई सलमा आणि सावत्र आई हेलनवर केला प्रेमाचा वर्षाव

बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता सलमान खाननेही आज सोशल मीडियावर एक गोंडस फोटो शेअर केला आहे. यामध्ये तो त्याची आई सलमा खान यांच्याबरोबर दिसत आहे. सावत्र आई हेलनदेखील या फोटोमध्ये आहेत.या फोटोमध्ये सलमान पांढऱ्या आणि गुलाबी रंगाच्या चेक्सच्या शर्टमध्ये बसलेला दिसत आहे. यादरम्यान त्याची आई सलमा त्याचा हात धरून त्याच्या शेजारी बसली आहे. हेलन अभिनेत्याच्या खांद्यावर हात ठेवून पोज देताना दिसत आहेत.आई सलमा आणि हेलन यांच्याबरोबरचा एक गोंडस फोटो पोस्ट करताना सलमान खानने एक अतिशय सुंदर कॅप्शनदेखील लिहिले आहे. तसेच, त्याने त्याचे वडील सलीम खान यांचेही आभार मानले. सलमान खानने लिहिले, "जगातील सर्वोत्तम आईसाठी, खूप खूप धन्यवाद बाबा. माझ्या जगातील सर्वात सुंदर महिलांना मातृदिनाच्या शुभेच्छा!" सलमान खानची ही पोस्ट पाहून चाहते त्याचे खूप कौतुक करत आहेत. एका चाहत्याने कमेंट केली, 'देशाचा सर्वोत्तम मुलगा.' दुसऱ्याने लिहिले, 'वाह, आयुष्यातील सर्वोत्तम क्षण.' याशिवाय, चाहते रेड हार्ट इमोजी कमेंट करून सलमानच्या पोस्टवर प्रेमाचा वर्षाव करत आहेत.सलमान खानने यापूर्वी भारत-पाकिस्तान शस्त्रविरामावर एक पोस्ट शेअर केली होती, जी त्याने नंतर डिलीट केली.



# अभिनेत्री मृण्मयी देशपांडेचा संदेश

११ मे २०२५ ला मातृदिन साजरा केला जात आहे. सर्व जण आईविषयी त्यांचे प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. यामध्ये कलाकारांचादेखील समावेश आहे. आता अभिनेत्री मृण्मयी देशपांडेने मातृदिनाच्या निमित्ताने तिच्या भावना व्यक्त करत एक खास संदेश दिला आहे.स्टार प्रवाह वाहिनीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. हा व्हिडीओ मृण्मयी देशपांडेचा आहे. मृण्मयी म्हणते, "कधी कुठे दुखापत झाली तर पहिल्यांदा तोंडातून आई गं हे शब्द बाहेर पडतात. अडचणीच्या काळात, आजारी पडल्यानंतर पहिल्यांदा तिची आठवण येते. जी व्यक्ती आपल्या यशात, सुख-दुःखात प्रत्येक वेळेला आपल्या बरोबर असावं असं वाटतं, ती व्यक्ती म्हणजे आपली आई असते."पुढे अभिनेत्री म्हणाली, "आईला आपली मुलं मोठी होतात असं कधीच वाटत नाही. तसंच मुलांनासुद्धा आपल्या आईचं वय वाढतंय, यावर कधी विश्वास बसत नाही. शेवटच्या क्षणापर्यंत आपण तिला गृहीत धरत असतो. मला असं वाटतं की गृहीत धरणं, हे जे नातं आहे किंवा इतका प्रचंड हक्क आपण ज्या व्यक्तीवर दाखवू शकतो, ती आई असते."आईसुद्धा म्हातारी होते हेदेखील डोक्यात ठेऊयात. आपल्यासाठी नाही तर आईसाठी काहीतरी भव्य-दिव्य करून दाखवूयात, असे म्हणत अभिनेत्रीने मातृदिनाच्या निमित्ताने खास संदेश दिला आहे. मृण्मयी देशपांडेबरोबरच अनेक कलाकारांनी मातृदिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. यामध्ये अमित भानुशाली, जुई गडकरी, ईशा केसरकर, हेमल इंगळे, मधुराणी प्रभुलकर, नम्रता संभेराव अशा अनेक कलाकारांचा समावेश आहे.मृण्मयी देशपांडेबाबत बोलायचे तर अभिनेत्री नुकतीच 'एक राधा एक मीरा' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला आली होती. महेश मांजरेकर दिग्दर्शित या चित्रपटात मृण्मयी देशपांडेसह अभिनेता गश्मीर महाजनी व सुरभी भोसले प्रमुख भूमिकेत दिसले होते. 'अग्निहोत्र', 'कुंकू' यांसारख्या मालिका आणि 'सुभेदार', 'महाराष्ट्र शाहीर', 'चंद्रमुखी', 'फर्जंद', 'शिकारी', यांसारख्या चित्रपटांमध्ये ती दिसली आहे. याबरोबरच ती रिॲलिटी कार्यक्रमांचे सूत्रसंचालनदेखील करताना दिसते.दरम्यान, अभिनेत्री अभिनयाबरोबरच शेती करतानादेखील दिसते. ती सोशल मीडियाच्या माध्यमातून महाबळेश्वर येथील शेतीबद्दल अनेक गोष्टी चाहत्यांबरोबर शेअर करताना दिसते.११ मे २०२५ ला मातृदिन साजरा केला जात आहे. सर्व जण आईविषयी त्यांचे प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. यामध्ये कलाकारांचादे आता अभिनेत्री मृण्मयी देशपांडेने मातृदिनाच्या निमित्ताने तिच्या भावना व्यक्त करत एक खास संदेश दिला



# दबाव नसतानाही लग्न करण्याचं कारण?

फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले. आता एका मुलाखतीत मलायकाने घटस्फोटाचा निर्णय कसा घेतला याबद्दल सांगितलं आहे. इतकंच नाही तर पोटगीचा उल्लेख करत लोकांनी किती वाईट कमेंट्स केल्या, तो प्रसंगही सांगितला. 'पिंकविला'ला दिलेल्या एका मुलाखतीत, मलायकाने तिच्या कुटुंबाकडून कोणताही दबाव नसतानाही २५ व्या वर्षी लग्न करण्यामागचं कारण सांगितलं. "मी अशा कुटुंबात वाढले नव्हते, जिथे 'अरे तुला या वयात लग्न करावं लागेल' असं म्हटलं गेलं. मला हवं तसं आयुष्य जगण्यास सांगितलं होतं. बाहेर जा, जीवनाचा आनंद घे, नवनवीन लोकांना भेट आणि रिलेशनशिपमध्ये राहा, असं सांगण्यात आलं होतं. इतकी मोकळीक असूनही माझ्या डोक्यात काय विचार आले ते मला माहित नाही, मी २२-२३ वर्षांचे असताना म्हणाले की मला लग्न करायचं आहे. माझ्यावर कोणीही लग्नासाठी दबाव आणला नाही पण मला तेच करायचं होतं, कारण त्या क्षणी माझ्याकडे हा सर्वोत्तम पर्याय होता," असं मलायका म्हणाली.मलायकाने कबूल केलं की लग्न झाल्यानंतर अनेक वर्षांनी तिला हे समजलं की तिला आयुष्यात हेच हवं नव्हतं. "जेव्हा मी घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला, तेव्हा मला वाटत नाही की इंडस्ट्रीमध्ये खूप महिला घटस्फोट घेत होत्या आणि आयुष्यात पुढे जात होत्या. मला माझ्यासाठी, माझ्या वैयक्तिक वाढीसाठी, मला माझ्या मुलाला आनंदी ठेवण्यासाठी, मुलाने आयुष्यात काहीतरी करावं यासाठी घटस्फोट हा योग्य पर्याय वाटला, तर मी तेच केलं," असं मलायका म्हणाली.घटस्फोटाकडे लोक तुच्छतेने पाहतात, असंही तिने नमूद केलं. "घटस्फोटानंतर माझ्या आजूबाजूच्या कोणालाही आनंदी करण्यासाठी मी स्थिर आणि आनंदी वाटणं गरजेचं होतं, कारण त्याची सुरुवात माझ्यापासून होते आणि मी तेच केलं," असं मलायकाने नमूद केलं. मलायका सोशल मीडियावर खूप लोकप्रिय आहे. मलायकाने सांगितलं की एकदा तिने परिधान केलेल्या एका ड्रेसची किंमत असलेली बातमी छापून आली होती, त्यावर खूप वाईट कमेंट्स होत्या. 'इतका महाग ड्रेस मलायकाला परवडू शकतो कारण तिला पोटगीत खूप पैसे मिळाले आहेत,' अशी एक कमेंट होती. ती पाहून मला धक्का बसला. या कमेंट्स पाहून मला इतकंच वाटलं की तुम्ही आयुष्यात कोणत्याही स्तरावर काहीही केले तरी त्याचा काही फरक पडत नाही, असं ती म्हणाली.फॅशन आयकॉन मलायका अरोरा सोशल मीडियावर खूप चर्चेत असते. अवघ्या विशीत ती अभिनेता अरबाज खानला भेटली आणि त्याच्या प्रेमात पडली. मग दोघांनी लग्न केलं पण लग्नाच्या १९ वर्षांनंतर दोघे विभक्त झाले.

# आयपीएलची तारीख ठरली!

## 3 शहरात सामने; या दिवशी रंगणार फायनलचा थरार

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारत आणि पाकिस्तानातील तणावाची स्थिती पाहता आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या स्पर्धेतील फायनलचा सामना २५ मे रोजी होणार होता. मात्र, आता बीसीसीआय ही स्पर्धा आणखी पुढे खेचणार असल्याचं म्हटलं जात आहे. इंडियन एक्स्प्रेसने दिलेल्या वृत्तानुसार स्पर्धेतील फायनलचा सामना ३० मे रोजी खेळवला जाऊ शकतो. या स्पर्धेतील उर्वरीत सामन्यांना १६ मे पासून सुरूवात होणार असल्याचं म्हटलं जात आहे. तर या स्पर्धेतील सामने चेन्नई, बंगळुरू आणि हैदराबादमध्ये खेळवले जाणार आहेत.**

आयपीएल २०२५ स्पर्धेतील एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. त्यापैकी ५८ सामने पूर्ण झाले आहेत. तर १६ सामने अजूनही शिल्लक आहेत. ज्यात प्लेऑफच्या सामन्यांसह फायनलचा देखील समावेश आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, या स्पर्धेचे सुधारीत वेळापत्रक आज संध्याकाळपर्यंत जाहीर केले जाऊ शकते. त्यामुळे आयपीएल स्थगित झाल्यानंतर मायदेशी परतलेल्या खेळाडूंच्या उपलब्धतेबद्दल आता चिंता व्यक्त केली जाऊ लागली आहे.बीसीसीआयच्या एका सुत्राने माहिती देताना म्हटले की, " आयपीएल स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आल्याने, आयपीएलचा फायनलचा सामना आता २५ ऐवजी ३० मे रोजी खेळवला जाऊ शकतो. ही स्पर्धा आता मर्यादीत ठिकाणी खेळवली जाऊ शकते. आज रात्रीपर्यंत सर्व संघांना वेळापत्रक पाठवले जाईल."बीसीसीआयने पंजाब किंग्ज संघाला वगळता इतर सर्व संघातील खेळाडूंना येत्या मंगळवारपर्यंत आपापल्या ठिकाणी हजर राहण्यासाठी सांगितलं आहे. कारण शुक्रवारपर्यंत आयपीएल स्पर्धा




पुन्हा एकदा सुरू केली जाऊ शकते. काही संघातील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्य मायदेशी परतले आहेत. आता त्या खेळाडूंना पुन्हा बोलवण्याचे आदेश बीसीसीआयने फ्रँचायझींनी दिले असल्याचे म्हटले जात आहे. गुरूवारी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स सामन्यातील पहिल्या डावातील १० षटकं झाल्यानंतर बीसीसीआयने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला होता.

आधी स्टेडियमच्या लाईट्स बंद करण्यात आल्या. त्यानंतर प्रेक्षकांना मैदानाबाहेर पाठवण्यात आलं आणि हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेवटी ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे खेळाडू आपल्या मायदेशी परतले आहेत. आता परदेशात गेलेल्या खेळाडूंना परत आणण्याचं मोठं आव्हान बीसीसीआय आणि फ्रँचायझींसमोर असणार आहे. आयपीएल २०२५ स्पर्धेतील एकूण ७४ सामने खेळवले जाणार आहेत. त्यापैकी ५८ सामने पूर्ण झाले आहेत. तर १६ सामने अजूनही शिल्लक आहेत. ज्यात प्लेऑफच्या सामन्यांसह फायनलचा देखील समावेश आहे. इंडियन एक्स्प्रेसच्या वृत्तानुसार, या स्पर्धेचे सुधारीत वेळापत्रक आज संध्याकाळपर्यंत जाहीर केले जाऊ शकते. त्यामुळे आयपीएल स्थगित झाल्यानंतर मायदेशी परतलेल्या खेळाडूंच्या उपलब्धतेबद्दल आता चिंता व्यक्त केली जाऊ लागली आहे.बीसीसीआयच्या एका सुत्राने माहिती देताना म्हटले की, " आयपीएल स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आल्याने, आयपीएलचा फायनलचा सामना आता २५ ऐवजी ३० मे रोजी खेळवला जाऊ शकतो. ही स्पर्धा आता मर्यादीत ठिकाणी खेळवली जाऊ शकते. आज रात्रीपर्यंत सर्व संघांना वेळापत्रक पाठवले जाईल."बीसीसीआयने पंजाब किंग्ज संघाला वगळता इतर सर्व संघातील खेळाडूंना येत्या मंगळवारपर्यंत आपापल्या ठिकाणी हजर राहण्यासाठी सांगितलं आहे. कारण शुक्रवारपर्यंत आयपीएल स्पर्धा पुन्हा एकदा सुरू केली जाऊ शकते.

### फायनलचा सामना 30 मे रोजी

काही संघातील खेळाडू आणि सपोर्ट स्टाफमधील सदस्य मायदेशी परतले आहेत. आता त्या खेळाडूंना पुन्हा बोलवण्याचे आदेश बीसीसीआयने फ्रँचायझींनी दिले असल्याचे म्हटले जात आहे. गुरूवारी पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्स सामन्यातील पहिल्या डावातील १० षटकं झाल्यानंतर बीसीसीआयने हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. आधी स्टेडियमच्या लाईट्स बंद करण्यात आल्या. त्यानंतर प्रेक्षकांना मैदानाबाहेर पाठवण्यात आलं आणि हा सामना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. शेवटी ही स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे खेळाडू आपल्या मायदेशी परतले आहेत. आता परदेशात गेलेल्या खेळाडूंना परत आणण्याचं मोठं आव्हान बीसीसीआय आणि फ्रँचायझींसमोर असणार आहे. भारत आणि पाकिस्तानातील तणावाची स्थिती पाहता आयपीएल २०२५ स्पर्धा एक आठवड्यासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या स्पर्धेतील फायनलचा सामना २५ मे रोजी होणार होता.

# कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच!

## पाकिस्तानच्या कृत्यावर माजी क्रिकेटपटू वीरेंद्र सेहवाग भडकला

**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये सध्या तणावाचं वातावरण आहे. २२ एप्रिलला दहशतवाद्यांकडून पहलगाममध्ये हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात निष्पाप भारतीयांनी आपले प्राण गमावले. त्यानंतर भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला चांगलंच प्रत्युत्तर दिलं**



दोन्ही देशांमध्ये गेल्या ३ दिवसांपासून तणाव सुरूच आहे. अखेर शनिवारी युद्धविराम जाहीर करण्यात आल्याची घोषणा परराष्ट्र मंत्रालयाकडून करण्यात आली. मात्र, पाकिस्तानने काही तासातच शस्त्रविरामचं उल्लंघन करून ड्रोन हल्ले केले. पाकिस्तानने केलेल्या या कृत्यानंतर माजी भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवागने संताप व्यक्त केला आहे.पाकिस्तानने शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यानंतर, पुन्हा एकदा संतापाचं वातावरण पाहायला मिळालं आहे. भारताचा माजी फलंदाज वीरेंद्र सेहवागने देखील संताप व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले आहे. वीरेंद्र सेहवाग सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असतो.यापूर्वीही अनेकदा त्याने पोस्ट शेअर करून पाकिस्तानला प्रत्युत्तर दिलं आहे. यावेळी त्याने एक्स अकाऊंवरून एक फोटो शेअर केला आहे. या फोटोला त्याने कुठलंही कॅप्शन दिलेलं नाही. त्याने केवळ फोटो शेअर केला आहे. या फोटोवर, "कुत्र्याची शेपूट वाकडी ती वाकडीच" असं लिहिलं आहे. सेहवागने हा फोटो कोणाला उद्देशून पोस्ट केला आहे, हे लिहिलेलं नाही. मात्र, सद्यस्थिती पाहता हा फोटो त्याने पाकिस्तानसाठी शेअर केला असल्याचं म्हटलं जात आहे. पाकिस्तानने केलेले प्रत्येक हल्ले भारतीय सैन्याने हाणून पाडले आहेत. भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत पाकिस्तानातील ९ दहशतवादी तळं उद्ध्वस्त केली. भारताने पाकिस्तानातील कुठल्याही नागरी वस्तीवर हल्ला केला नाही. मात्र, पाकिस्तानने सर्व मर्यादा ओलांडल्या. पाकिस्तानने सीमलगत असलेल्या गावांवर ड्रोन हल्ले केले. मात्र, भारतीय सैन्याने हे सर्व ड्रोन खाली पाडले. वीरेंद्र सेहवागने नाव न घेता पाकिस्तानवर संताप व्यक्त केला आहे. तर दुसरीकडे भारताचा माजी सलामीवीर फलंदाज शिखर धवनने देखील एक्स अकाऊंवरून पोस्ट शेअर करून पाकिस्तानवर टीका केली आहे."फालतू देशाने पुन्हा एकदा आपला फालतूपणा जगाला दाखवून दिला..

### शिखर धवनची संतप्त प्रतिक्रिया

अखेर शनिवारी युद्धविराम जाहीर करण्यात आल्याची घोषणा परराष्ट्र मंत्रालयाकडून करण्यात आली. मात्र, पाकिस्तानने काही तासातच शस्त्रविरामचं उल्लंघन करून ड्रोन हल्ले केले. पाकिस्तानने केलेल्या या कृत्यानंतर माजी भारतीय फलंदाज वीरेंद्र सेहवागने संताप व्यक्त केला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
।सोमवार।
। दि. 12 मे 2025।

## प्रियदर्शनी स्कूलच्या विद्यार्थ्यांची आयआयटी

# मुंबईच्या ‘एरोस्पेस’मध्ये सहल!

**शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांनी अनुभवला एरोस्पेसमधील गणित आणि विज्ञानाचा अविष्कार**






**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आळंदी येथील प्रियदर्शनी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईच्या एरोस्पेस अभियांत्रिकी विभागाला शैक्षणिक भेट दिली. यावेळी गणित आणि विज्ञानाचा अविष्कार तसेच एरोस्पेस तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.**

प्रियदर्शनी स्कूलच्या इयत्ता ८ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांनी आयआयटी मुंबईच्या एरोस्पेस अभियांत्रिकी विभागाला शैक्षणिक भेट देत अविस्मरणीय क्षणांचा अनुभव घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांनी या अत्याधुनिक एरोस्पेस तंत्रज्ञानाचा अविष्कार पहिला. उड्डाणाचे आश्चर्यकारक विज्ञान अनुभवले. विज्ञान व गणित या विषयांचे प्रत्यक्ष जीवनातील महत्त्व समजून घेतले. यावेळी विमानांच्या थरारक प्रात्यक्षिकांमुळे ही सहल विद्यार्थ्यांसाठी अतिशय प्रेरणादायक आणि ज्ञानवर्धक ठरली.

> “आयआयटी मुंबईमधील एरोस्पेस अभियांत्रिकी विभागाची ही सहल विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभरासाठी अविस्मरणीय ठरणार आहे. यातून विद्यार्थ्यांना एक नवी पाऊलवाट मिळणार आहे. विद्यार्थ्यांमधील भावी संशोधकांना मोठी स्वप्नं पाहण्याची आणि आकाशाला गवसणी घालण्याची प्रेरणा या सहलीतून मिळाली आहे.
> **–सरिता सिंग,** सीईओ, प्रियदर्शनी स्कूल, आळंदी

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

KAMALA Education Society

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**





Approved by AICTE | B+ NAAC Accredited
Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

2 Years' Full Time Postgraduate Courses
& 3/4 years' Full time Undergraduate Courses

Sharpen your leadership skills through

## MBA
Master of Business Administration

## MCA
Master of Computer Appplications

Join PIBM to become a competent professional ....

- International Certifications
- Live Industry Projects
- Startup & Business Alignments
- Research Ventures
- International Case Studies
- Industrial Visits
- Foreign Language
- Add on Skill Certifications
- Sports - Cultural Configurations
- Cross Domain Industry Specialisation
- Mentoring and Seed Funds for Startups
- International Alumni Interactions
- Association as Mentor with MCED
- Association as Mentor with IIT's
- Association as Mentor with Startup India

AICTE Approved 3/4 Years' Full time Undergraduate Course

## BBA
Bachelor of Business Administration

## BCA
Bachelor of Computer Applications

**Call for more details:**

**MBA/BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**MCA/BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
ADMISSION
OPEN
2025-2026
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


ADMISSION OPEN
Moraya Shikshan Sanstha
"यत् भावो – तत् भवति"
Computer 15 days Crash Course
Our Courses
> PowerPoint with animation
> Basic Excel
> Corel Draw
> Adobe Photoshop
> Scratch Animation
> 'C' Language
> Basic Java
> Basic Tally
From
5th May 2025
1 Hour / day
Monday to Saturday
Contact
8087706100
Registration started
Venue: Computer Lab,
V. K. Mate Highschool